# 'मधुबन'च्या सेंद्रिय मधावर मान्यतेची मोहर!

## ग्राहकांना मिळणार खात्रीचा मध; मधमाशापाळांना अधिक फायदा

**अभिजित खुरासणे :**
सकाळ वृत्तसेवा

### वैशिष्ट्ये व फायदे

- **प्रदूषणविरहित व पीक उत्पादन नसणाऱ्या जंगलातून मध संकलन**
- **पश्चिम घाटातील जांभूळ, हिरडा, गेळा, कारवी, आकरा आदी वनस्पतींपासूनचा मध मिळणार**
- **शुद्धता व गुणवत्तेसाठी सर्वोच्च प्राधान्य**
- **दुर्गम भागातील लोकांना सेंद्रिय मधामुळे खात्रीचा रोजगार**
- **जंगलाचे संरक्षण-संवर्धन होऊन मधमाशा पालन व्यवसायास मिळेल बळ.**



महाबळेश्वर, ता. ३० : समृद्ध पश्चिम घाटातील महाबळेश्वर परिसरातून उत्पादित होणाऱ्या मध संचालनालयाच्या 'मधुबन' या मधाला आता सेंद्रिय मध म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. याशिवाय सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांच्या डोंगरी भागातील शेतकऱ्यांना मधाला ३५० रुपये प्रति किलो दर तसेच मध संचालनालयाच्या नफ्यातील १५ टक्के वाटाही मिळणार आहे.

पश्चिम घाटातील या चार जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात कार्यरत असलेल्या मध उद्योगास खादी व ग्रामोद्योग मंडळाने चालना दिली. शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेळी-कुक्कुटपालन यासारख्या उपजीविकेचे दुय्यम साधनांच्या तुलनेत मधमाशा पालन हा चांगला व्यवसाय ठरला आहे. मधमाशा पालनामुळे मुख्य पिकांमध्ये परागीकरण होऊन पीक उत्पादन वाढते. तसेच शेतकऱ्यांना मध विक्रीतून चांगले उत्पन्न मिळू लागले आहे. जैवविविधतेने समृद्ध अशा पश्चिम घाटातील जंगलातून गोळा होणारा मध अतिशय चांगल्या दर्जाचा व उच्च गुणवत्तेचा असल्याने त्याचे प्रभावी 'मार्केटिंग' झाले तर शेतकरी मधपाळांना चांगला दर व ग्राहकांना खात्रीचा चांगला मध मिळेल, या उद्देशाने सेंद्रिय मध संकल्पना राबविण्यात येत असल्याचे खादी ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश देवकर यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले.

ज्या गावांच्या दहा ते १५ किलोमीटर क्षेत्रात शेती होत नाही अथवा ती सेंद्रिय पद्धतीची असेल अशा भागातून गोळा होणाऱ्या मधास सेंद्रिय मध म्हणून मान्यता मिळते. पुण्यातील केंद्र शासनमान्य 'नॅचरल ऑरगॅनिक सर्टिफिकेशन ॲग्रो' या संस्थेने सेंद्रिय मध संकलनासाठी साताऱ्यातील १२, सांगलीतील सहा, कोल्हापूर २२, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सहा अशी ४६ गावे निवडली आहेत. पश्चिम घाटातील रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, नगर, नाशिक, नंदुरबार, धुळे व पुणे या जिल्ह्यांतील सेंद्रिय मध अनुकूल असलेल्या भागाचे सर्वेक्षण करून ही सर्व गावे सेंद्रिय मध योजनेत लवकरच अंतर्भूत करण्यात येतील," असेही श्री. देवकर यांनी सांगितले.

सेंद्रिय मध विक्रीतून मध संचालनालयाच्या नफ्यातील १५ टक्के वाटा शेतकरी मधमाशापाळांना वर्षाअखेरीस देण्यात येणार आहे. हा वाटा मधपेट्या, मध यंत्र अशा स्वरूपातील असेल, असे महाबळेश्वर येथील 'मधुबन'चे संचालक बी. बी. जगताप यांनी सांगितले. संचालनालयाच्या मधाची विक्री तीन वर्षांपूर्वी सात लाख रुपये होती. आज ती तब्बल पन्नास लाख रुपयांपर्यंत वाढली आहे. महाबळेश्वरच्या 'मधुबन मध' विक्रीचा हा उच्चांक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.